नवराष्ट्र

# चर्चासत्रातून आदिवासी साहित्याचा जागर



डहाणू, (वा.) कॉम्रेड गोदावरी परुळेकर महाविद्यालय तलासरी आणि भारतीय साहित्य अकादमी यांच्या वतीने १६ आणि १७ फेब्रुवारी रोजी 'महाराष्ट्रातील आदिवासी लोक साहित्य' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राचे उद्घाटन साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या हस्ते करण्यात आले. मराठी साहित्यिक डॉ. विनोद कुमरे यांनी मानवी संस्कृतीचे धागेदोरे लोकसाहित्यातून उकलले जातात हे स्पष्ट केले. अदिवासी जीवनाच्या चालीरिती, रूढी, परंपरा, इतिहास लोकसाहित्यामध्ये सामावलेले आहेत, हे सांगितले. लोकसाहित्याचा मूलाधार हा भाषा असून या लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे संवर्धन होते. म्हणून लोकसाहित्य जतन करणे ही महत्त्वाची बाब आहे याची जाणीव करून दिली. साहित्यिक रंगनाथ पठारे यांनी अध्यक्षीय भाषणातून अदिवासी समाज टिकविणे म्हणजेच मूल्यव्यवस्था टिकविणे गरजेचे आहे हे स्पष्ट केले. दरम्यान, प्राचार्य डॉ. बी. ए. राजपूत यांच्या 'पालघर जिल्ह्यातील माच्छी समाज : लोकजीवन व लोकसाहित्य' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

Palghar Plus Edition
19 February 2023 Page No. 1
epaper.navarashtra.com